**सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात**

**नि.फौ.ख.क्र. १४५/२०२५.** **निशाणी क्र.१६**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | विष्णु शहाजी कोकणे, |
| वय | – | ३० वर्षे, |
| व्यवसाय | – | सिमेंट वस्तुचा व्यवसाय, |
| राहणार | – | देवगाव ता. परंडा जिल्हा उस्मानाबाद. |

**सरतपासणी सहा. सरकारी वकील श्री.व्ही.एस.भादुले साहेब यांचे मार्फत –**

आरोपी माझ्याकडे ब–याच वर्षापासुन कामाला होते. सिध्देश्वर जगताप माझे मामा आहेत. २०२५ च्या पूर्वी माझ्याकडे दुचाकी वाहन होते. ते वाहन माझ्या मामाचे होते. घटना पाच ते सहा महिन्यापूर्वी घडली. दुचाकी गाडी पाचपिंपळा रस्त्यावरुन चोरीला गेली होती. ती गाडी नंतर मला बार्शी रस्त्यावर चांदणी गावामध्ये मिळाली. आरोपी ती गाडी घेवुन गेले होते. गाडी मिळाल्यानंतर मी एफ.आय.आर. दाखल केला. आता मला एफ.आय.आर. दाखविण्यात आला, त्यातील मजकुर मी पोलीसांना सांगितला होता, तो माझे सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आला आहे. त्यास **निशाणी क्र. १७** देण्यात येते. आरोपींनी गाडी नेली होती असे त्यांनीच सांगितले. त्यामुळे मला आरोपींनी गाडी नेल्याचे कळाले. आरोपी आज हजर आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे श्री. एस.एस.जाधव यांचे मार्फत –**

मी आरोपींना प्रत्यक्ष गाडी नेताना पाहिले नाही. प्रत्यक्षात गाडी कोणी नेली हे मला माहिती नाही. मी अज्ञात आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली. मी पोलीसांना

अज्ञात आरोपीविरुध्द तक्रार केली होती. आरोपींविरुध्द माझी कोणतीही तक्रार नाही. आरोपी व माझ्यात तडजोड झालेली आहे.

उलटतपास नाही.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by
DILIP GANGADHAR
JAGTAP
Date: 2026.03.25
16:37:17 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–२५.०३.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.